जा.क्र.माध्य-४/काबग/कोवि/१४/
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
कोल्हापूर दिनांक :- ०३/१२/२०१४

प्रति,

लेखाधिकारी,
लेखा परिक्षण पथक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

**विषय क्रमांक १ : वेतन निश्चितीमध्ये झालेल्या चुकांची दुरुस्ती करण्यासाठी प्राप्त झालेल्या अपिलावर निर्णय घेणे**
**सदर्भः-** कार्यबळ गट समिती बैठक दि. **०३.१२.२०१४**

| अनु.क्र. | नाव शाळा | संबंधीत लेखाधिकारी यांचे अभिप्राय | निर्णय |
|---|---|---|---|
| **१** | १.श्री.जनार्दन धोउीबा दळवी,सहा.शिक्षक आजरा महाविद्यालय आजरा,जि. कोल्हापूर<br>२.श्री किरण भरतराव प्रधान,सहा.शिक्षक आजरा महाविद्यालय आजरा,जि.कोल्हापूर<br>३. श्री.मदन शंकरराव हिरेमठ,सहा.शिक्षक , महाराष्ट्र हायस्कूल कोल्हापूर<br>४. श्री.कृष्णांत दिनकर सोनाळकर,सहा.शिक्षक श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,कोल्हापूर | ५ वा वेतन आयोग शासन निर्णय क्र.पावेआ/१०९९/४८/९९/माशि-२ दिनांक १३ मे,१९९९ च्या शासन निर्णयानुसार दि.०१.०१.१९९६ पडताळणी यापुर्वी करून देणेत आली आहे. तथापि संबंधित शिक्षकांनी वरील दिनांक २६.०२.२०१४ च्या शासन निर्णयानुसार सुधारीत त्रिस्तरीय वेतन निश्चितीची पडताळणी करून मिळणेसाठी प्रस्ताव सादर केले आहेत. शासन निर्णय दि.१३ मे,१९९९ पृष्ठ १६ कलम ७ (अ) नुसार जो कर्मचारी दि.०१.०१.१९९६ नंतर परंतु ३१.डिसेंबर १९९७ पर्यंतच्या कालावधी मध्ये येणा-या त्याच्या पुढील वेतनवाढीच्या तारखेपासून सुधारीत वेतनश्रेणी निवड करतो.असा कर्मचारी १ जानेवारी १९९६ पासून सुधारीत श्रेणी स्वीकारण्याच्या तारखेपर्यंतचे मुळ वेतनाच्या ४० टक्के वाढीची रक्कम मिळण्यास पात्र असणार नाही. | सदर प्रकरणी प्रथमतः लेखाधिकारी लेखा परिक्षण पथक,कोल्हापूर यांचे स्तरावर कार्यवाही होणे अपेक्षीत आहे. सदर वेतननिश्चिती संबंधी लेखाधिकारी लेखा परीक्षण पथक,कोल्हापूर यांनी पडताळणी करून निर्णय घ्यावा.निर्णयासंबधी अपिल सादर केल्यास प्रकरण कार्यबळ गटास सादर करावे. |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्री.जाधव राहूल जानू , शिपाई,नवजीवन विद्यालय,फुणगूस,ता.संगमेश्वर,जि.रत्नागिरी, | यांच्या सेवापुस्तकांच्या नोंदीबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,रत्नागिरी यांनी त्यांचेकडील दिनांक ०३.०५.१९९९ अन्वये श्री.जाधव यांना त्यांनी घेतलेल्या विकल्पानूसार दि.०१.१२.१९९४ पासून कालबध्द पदोन्नती अंतर्गत वरीष्ठ श्रेणी रू. ७७५-११५० मंजुर केलेली आहे. त्यानुसार श्री.जाधव यांनी दिलेला विकल्प विचारात घेवून त्यांचे वरीष्ठ वेतनश्रेणी रू.७७५-१२-९५५ दरो-१५-११३०-२०-११५० मध्ये रू.९८५/-(९६८ + १४ = ९८२ = पुढील टप्पा) वेतननिश्चित करून पुढील वेतनवाढ दि.०१.१२.१९९५ निश्चित केलेला आहे. परंतु पडताळणी करत असतांना श्री.जाधव यांचे दि.०१.१०.१९९४ रोजीचे मुळ वेतन रू.९६८/- हे विचारात घेऊन रू.९८५/- वेतननिश्चित करून पुढील वेतनवाढ दि.०१.१०.१९९५निश्चित केलेला आहे. वस्तूतः श्री.जाधव हे दि.०१.१०.१९९४ रोजी (०१.१२.१९९३ चे वेतनानुसार) रू.९५४/- वेतन घेत असल्यामुळे सदर वेतन निश्चितीची पडताळणी चुकीची झालेली आहे. (सेवापुस्तक पृष्ठ क्र.१०) | श्री.जाधव राहूल जानू, यांनी दिलेल्या विकल्पान्वये दि.१.१२.१९९४ पासून कालबध्द पदोन्नती अनुज्ञेय असल्याने फेरवेतन निश्चिती करण्यात यावी. फेरवेतन निश्चिती नूसार जादा वेतन अदा होत असल्यास वसूली करण्यात यावी. व त्याबाबतची पडताळणी लेखाधिकारी ,लेखापरिक्षण पथक,रत्नागिरी यांनी करावी. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्री. शशिकांत अनंत कापसे ,सहा.शिक्षक , बी.एम रोटे कनिष्ठ महाविद्यालय,कोल्हापूर | दिनांक १७/०६/२०१४ च्या पत्रानुसार, पुर्णवेळ शिक्षकांचा कार्यभार असतांना त्यांना दिलेला नसलेने जून १९९० ते फेब्रुवारी १९९९ या कालावधीत अर्धवेळ कार्यभारावर मान्यता असलेने व मार्च १९९९ पासून पुर्णवेळ कार्यभारावर मान्यता देणेत आलेली असलेने पुर्णवेळ कार्यभार दिला त्यापासून जुनी वेतनश्रेणी संरचित करावी अशी मागणी केलेली आहे.<br>श्री.कापसे यांची मागणी ही वेतननिश्चिती संदर्भाची असलेने व यापुर्वी श्री.कापसे यांची ५ व्या व ६ व्या वेतन आयोगानुसार पुर्णवेळेची वेतननिश्चिती झालेली असून त्याप्रमाणे पडताळणी झालेली आहे. | अर्धवेळ सेवा ही वेतनश्रेणी संरक्षीत करणेसाठी ग्राहय धरता येणार नाही. तथापि पूर्णवेळ शिक्षकाचा कार्यभार असताना अर्धवेळ शिक्षक म्हणून मान्यता दिल्याने जुनी वेतनश्रेणी संरक्षीत करता येईल का? या संबंधीचा पाठपुरावा व निर्णय प्रशासकीय स्तरावर होणे आवश्यक आहे. संबंधीत प्रकरणास प्रशासकीय स्तरावर निर्णय घ्यावा. |
| ४. | श्री. श्री.सोलनकर बी.एस.पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय सलगरे,ता.मिरज,जि.सांगली | यांच्या लेखाधिकारी यांनी वेतनपडताळणी केलेबाबत संदिग्धता व्यक्त केलेली आहे.तसेच श्री.सोनलकर बी.एस.यांचे थकीत वेतनाचा कालावधी दि.०१/०७/२००३ ते ३१/०४/२००४ हा ५वर्षापेक्षा जास्त असलेने या कालावधीतचे थकीत वेतनास या कार्यालयाचे स्तरावरून मान्यता देता येणार नाही.<br>या संदर्भात श्री.सोलनकर यांनीही दि.०२/०५/२०१३ च्या पत्रान्वये आपले म्हणणे सादर केलेले आहे. ते सोबत सादर केलेले आहे. | थकीत वेतन प्रकरण कार्यबळ गट कक्षेतील नाही. सदर प्रकरणी प्रशासकीय स्तरावर निर्णय घ्यावा.सदर प्रकरणात चुकीची वेतननिश्चिती झाली असल्यास अपिल सविस्तर अहवालासह प्रकरण लेखाधिकारी,लेखा परीक्षण पथक,सांगली यांचेमार्फत मुळ सेवापुस्कांसह संस्थेमार्फत सादर करावे. वेतननिश्चितीबाबत कार्यबल गटात निर्णय देता येईल तथापि थकीत वेतनाचा निर्णय प्रशासकीय स्तरावर घेण्यात यावा. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | श्री.धुमाळे शिपाई एस.पी.हायस्कूल करूंदवाड व तराळ | यांचे वेतन समानीकरण्याबाबत कार्यबळ समिती मध्ये संबंधित कर्मचा-यांची मुळ वैयक्तीक मान्यता पत्र मागविण्यात आले होते.लेखाधिकारी यांनी दि.१४/७/२०१४ च्या पत्रान्वये श्री.धुमाळ व श्री.तराळ यांचे वैयक्तीक मान्यता पत्राच्या प्रती सादर केल्या आहे. | श्री.तराळ शिपाई यांचे वेतन श्री.धुमाळे शिपाई यांच्या वेतनाप्रमाणे दिनांक १.७.२००७ पासून वित्त विभाग अधिसुचना २२.०४.२००९ नियम ७ टिप क्र.७ प्रमाणे समानीकरण करून दयावे. |

सही

अध्यक्ष
तथा
शिक्षण उपसंचालक
कार्यबळ गट कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

**विषय क्रमांक २ : खाजगी/संस्थेच्या मालकीचे इमारतीचे थकित भाडे मंजूर करणे**

**सदर्भ:-** कार्यबळ गट समिती बैठक दि. **०३.१२.२०१४**

| अनु.क्र | तपशील | शिक्षणाधिकारी यांचे अभिप्राय | निर्णय |
|---|---|---|---|
| १. | शाळेचे नाव :- अर्जुना माध्यमिक विद्यालय,कारवली ता.राजापूर जि.रत्नागिरी<br>संस्थेचे नाव :- अर्जुना खोरे विकास मंडळ,कारवली ता.राजापूर जि.रत्नागिरी | शिक्षणाधिकारी (माध्य.)जि.प. रत्नागिरी यांनी सदर शाळेच्या **०६** खोल्यांना दरमहा **५,५५५/-** प्रमाणे दि. **डिसेंबर २००६** पासून इमारत भाडे मंजूर करणेस शिफारस केली आहे. | शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.रत्नागिरी यांचे शिफारसी नुसार प्रस्ताव परिपुर्ण असल्याने अर्जुना माध्यमिक विद्यालय कारवली ता.राजापूर जि.रत्नागिरी या शाळेचा दि.१ डिसेंबर २००६ पासून ६ खोल्यांना रक्कम रूपये ५५५५/- इमारत भाडे मंजूर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. |
| २. | शाळेचे नाव :- श्रीमती. इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय/ज्युनिअर कॉलेज पेठवडगांव<br>संस्थेचे नाव :- श्री.बाळासाहेब माने शिक्षण प्रसारक मंडळ अंबप ता.हातकणंगले | शिक्षणाधिकारी (माध्य.)जि.प. कोल्हापूर यांनी सदर शाळेच्या **१८** खोल्यांना दरमहा **११५१९/-** प्रमाणे दि. **०५.१०.१९९८** पासून इमारत भाडे मंजूर करणेस शिफारस केली आहे. | शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.कोल्हापूर यांचे शिफारसी नुसार प्रस्ताव परिपुर्ण असल्याने श्रीमती.इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय/ज्युनि.कॉलेज पेठवडगांव या शाळेचा दि.५ ऑक्टोंबर १९९८ पासून १८ खोल्यांना रक्कम रूपये ११५१९/- इमारत भाडे मंजूर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. |
| ३. | शाळेचे नाव :- कै.द.रा.पाटील माध्यमिक विद्यालय पाट पन्हाळा ता.पन्हाळा जि.कोल्हापूर<br>संस्थेचे नाव :- कोडोली विभाग शिक्षण संघ कोडोली, | शिक्षणाधिकारी (माध्य.)जि.प. कोल्हापूर यांनी सदर शाळेच्या **०५** खोल्यांना दरमहा **४५०६/-** प्रमाणे दि. **०१.०४.२००७** पासून इमारत भाडे मंजूर करणेस शिफारस केली आहे. | शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.कोल्हापूर यांचे शिफारसी नुसार प्रस्ताव परिपुर्ण असल्याने कै.द.रा.पाटील माध्यमिक विद्यालय पाट पन्हाळा ता.पन्हाळा जि.कोल्हापूर या शाळेचा दि.१ एप्रिल २००७ पासून ५ खोल्यांना रक्कम रूपये ४५०६/- इमारत भाडे मंजूर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. |

सही

अध्यक्ष
तथा
शिक्षण उपसंचालक
कार्यबळ गट कोल्हापूर विभाग, कोल्हापूर